महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३४२ वा | दिनांक : २६/११/२०२५ | वार : बुधवार

# पटोले-भाजप भेटीतून राजकारणात खळबळ



**नागपूर** : नगरपालिका निवडणुकांची घोषणा होताच राज्यभरात राजकीय हालचालींना वेग आला आहे. विशेषतः भाजपमध्ये उमेदवारीच्या वाटपावरून मोठे असंतोषाचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी पक्षातील पदाधिकाऱ्यांना अपेक्षित तिकिटे न मिळाल्याने त्यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली असून अनेकांनी राजीनाम्याची धमकीदेखील दिली आहे. स्थानिक पातळीवर चालू असलेली अस्वस्थता आणि आंतरिक पडसाद यामुळे भाजपसमोरील निवडणूक लढत आणखी कठीण होणार की काय, अशा चर्चा सुरू आहेत. अशातच काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपचे अल्पसंख्याक आघाडीचे प्रदेश सदस्य आबिद सिद्दिकी यांच्या घरी अचानक भेट देत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली, पण या भेटीमागचे राजकारण आता वेगाने रंगू लागले आहे.

आबिद सिद्दिकी यांनी काही दिवसांपासून पक्षीय निर्णयांवर नाराजी व्यक्त केल्याची चर्चा होती. तिकिटावरून वंचित राहिल्यानंतर त्यांचा पक्षाशी दुरावा वाढत असल्याचे स्थानिक पातळीवर बोलले जात होते. दरम्यान, पटोले यांनी घेतलेली भेट ही केवळ औपचारिक की त्यामागे गंभीर राजकीय हेतू, याबाबत विविध तर्कवितर्क सुरू आहेत. काँग्रेसकडून अल्पसंख्याक मतदारांना साधण्यासाठी नव्या रणनीतीचा हा भाग तर नाही? असा प्रश्न राजकीय वर्तुळात उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे भाजपमध्ये उमेदवारीवरून निर्माण झालेल्या मतभेदांमुळे विरोधकांना संधी मिळत असून, त्याचा फायदा घेण्यासाठी काँग्रेस प्रयत्नशील असल्याचे जाणवते.

याचवेळी दुसरीकडे चंद्रपूर जिल्ह्यातील मुल नगरपरिषद निवडणुकाही मोठ्या चर्चेत आहेत. या निवडणुकीत भाजपचे वरिष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार प्रतिष्ठेची लढत लढत आहेत. प्रचारसभेत त्यांनी केलेल्या एका विधानाने सध्या तापलेल्या राजकीय वातावरणात आणखी रंग भरला आहे. ज्या वॉर्डात काँग्रेसचा नगरसेवक निवडून येईल, तिथे भाजपकडून बोर्ड लावून नागरिकांना विकास काँग्रेसकडून मागा, असा संदेश लिहिला जाणार असल्याचे मुनगंटीवार म्हणाले. या वक्तव्याने वातावरण ढवळून निघाले असून, विरोधकांनी त्यांच्या विधानावर जोरदार टीका सुरू केली आहे.

# संजय लवकरच मैदानात दिसतील, तेही हातात तलवार घेऊन : उद्धव ठाकरें

**मुंबई** : शिवसेनेचे नेते आणि महाविकास आघाडीचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज संजय राऊत यांच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी भांडूप येथील त्यांच्या घरी भेट दिल्यानंतर मोठे विधान केले आहे. राऊत यांची तब्येत मागील काही दिवसांपासून बिघडलेली असल्याने त्यांनी सार्वजनिक कार्यक्रमांपासून अंतर ठेवले आहे. मात्र, आज झालेल्या भेटीत राऊत यांचा उत्साह पाहून उद्धव ठाकरे यांनी समाधान व्यक्त केले.

माध्यमांशी बोलताना त्यांनी विनोदी शैलीत सांगितले की, आता मी राऊतांना रोज फोन न करता त्यांच्या भावालाच त्यांची खबरबात घेण्यासाठी त्रास देतो. त्यांनी पुढे सांगितले की राऊत आता प्रकृतीच्या अडचणीतून सावरत असून त्यांचे पुनरागमन लवकरच होणार आहे. फक्त परत येणार नाहीत, तर पूर्वीपेक्षा अधिक जोमाने राजकीय रणांगणात उतरणार, असा विश्वासही ठाकरे यांनी व्यक्त केला. संजय लवकरच पुन्हा मैदानात दिसतील... आणि या वेळी हातात तलवार घेऊन, अशा शब्दांत त्यांनी राऊतांच्या लढाऊ वृत्तीवर मोहोर मारली. ठाकरे यांच्या या विधानामुळे शिवसेना-ठाकरे गटात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

राज्यातील राजकारणात नेहमीच ठाम भूमिका घेणारे आणि आपली भूमिका स्पष्टपणे मांडणारे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे राज्यसभा खासदार संजय राऊत हे गेल्या काही दिवसांपासून प्रकृतीच्या गंभीर समस्यांमुळे घराबाहेर निघू शकले नाहीत. वैद्यकीय तपासणीत त्यांना गंभीर प्रकारचा आजार असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना पूर्ण विश्रांती घेण्यास सांगिले आहेत. त्यामुळे ३१ ऑक्टोबरपासून त्यांनी सर्व सार्वजनिक कार्यक्रमांना ब्रेक दिला आहे. याच पार्श्वभूमीवर मंगळवारी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी खास त्यांच्या भांडूप येथील निवासस्थानी जाऊन भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृतीची सविस्तर विचारपूस केली. या भेटीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते.

उद्धव ठाकरे दुपारी भांडूपमधील मैत्री नावाच्या बंगल्यावर पोहोचले तेव्हा राऊत यांचे बंधू, आमदार सुनील राऊत यांनी त्यांचे स्वागत केले. संजय राऊत यांना थेट भेटून त्यांच्याशी काही काळ चर्चा केली. गेल्या काही आठवड्यांपासून प्रकृती ढासळल्यामुळे राऊत यांनी संपूर्ण राजकीय कामकाज थांबवले होते. त्यांनी सोशल मीडियावरून स्वतःच माहिती देत सांगितले होते की, अचानक प्रकृतीत गंभीर स्वरूपाचा बिघाड झाला असून डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांना गर्दीपासून आणि ताणतणावापासून दूर राहणे आवश्यक आहे. या परिस्थितीत उद्धव ठाकरे यांची प्रत्यक्ष भेट राऊत कुटुंबासाठी धीर देणारी ठरली.

या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना उद्धव ठाकरे यांनी संजय राऊत यांच्या लवकर बरे होण्याबद्दल पूर्ण खात्री व्यक्त केली. ते म्हणाले, अनेक दिवसांपासून त्यांना भेटण्याचं मनात होतं. आज भेट झाली आणि खूप समाधान वाटलं. संजय आता आधीपेक्षा बरे दिसत आहेत. ते लवकरच राजकीय मैदानात परत येतील आणि नेहमीप्रमाणे आपल्या शब्दांनी आणि भूमिकेने वातावरण तापवताना दिसतील. उद्धव ठाकरे यांच्या या वक्तव्यामुळे शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाची लहर पसरल्याचे दिसून आले.

जरी डॉक्टरांनी संजय राऊत यांना बाहेर न पडण्याचे आदेश दिले असले, तरी १७ नोव्हेंबरला बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांनी डॉक्टरांचा सल्ला बाजूला ठेवत शिवाजी पार्कवर जाऊन अभिवादन केले होते. मास्क लावून आणि सुनील राऊत यांच्या आधाराने त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळाला वंदन केले. यामुळे संकटात असतानाही त्यांचा शिवसैनिक जागा असल्याचे कार्यकर्त्यांना पुन्हा जाणवले.

# फोडाफोडीचा निवडणुकीवर परिणाम होऊ शकतो - मंत्री शिरसाटांचा भाजपला इशारा



**छत्रपती संभाजीनगर** : लोकं ऑप्शन शोधत असतात याचा अर्थ प्रवेश देणं होते नाही हे चंद्रशेखर बावनकुळे यांना काय ठरलंय हे त्यांनाही माहिती आहे. आम्ही तुमच्याकडून जो संयम शिकलो आहे तो पाळतो आहोत, जर असा पक्ष वाढवायचा असेल तर तो त्यांना लखलाभ,असे शिवसेना प्रवक्ते संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.

मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, महायुतीमध्ये फोडाफोडी करायची नाही मित्रपक्षांच्या कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना दुसऱ्या पक्षात घ्यायचे नाही हे ठरलेले असताना काही लोकांना छत्रपती संभाजीनगरमध्ये काही लोकांना पैशाची मस्ती आली आहे त्यांच्या जोरावर त्यांनी फोडाफोडी केली आहे. आम्ही याची गांभीर्याने दखल घेतली असून याचा अहवाल आम्ही एकनाथ शिंदे यांना देणार आहोत. महायुतीच्या अंतर्गत जर हे सुरू राहिले तर त्याचा परिणाम सर्वांनाच भोगावा लागेल हे मी स्पष्टपणे सांगत आहे.

संजय शिरसाट म्हणाले की, पैसा जनतेचा आहे, आपल्याकडे वॉचमनकी दिलेली आहे जनता आपली मालक असून तो पैसा जनतेचा आहे. नाही तर हा पैसा आपण घरी घेऊन गेलो असतो. मालक म्हणून सत्ता चालवणे सोपं नाही. अनेक हुकूमशहाचे राज्य गेले आहे.आपण जनतेचे सेवक म्हणून वागले तर बरे राहील.

संजय शिरसाट म्हणाले की, एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांची चर्चा झाली आहे, त्यांच्यामध्ये कोणतेही मतभेद नाहीत त्यांनी ठरवल्याप्रमाणे आम्ही कोणत्याही भाजप पदाधिकाऱ्याला प्रवेश देत नाही. पण भाजपने आमचे उमेदवार आणि पदाधिकारी फोडणे हे कितपत योग्य आहे? असा सवाल शिरसाट यांनी केला आहे. आम्ही जर तालुका लेव्हल वरील कार्यकर्ता घेतला तर त्यांना वाइट वाटू देऊ नये. हे मुद्दाम होत आहे की स्थानिक लेव्हलची मस्ती आहे हे एकदा पाहावे लागेल.

मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, वर्चस्व सिद्ध करण्यासाठी आम्ही जर एखादे पाऊल उचलले तर त्यांचे वाईट वाटून घेऊ नका. सुरवात त्यांनी केली असली तरी आम्ही अजूनही संयम राखला आहे, पण तो जास्त काळ टिकणार नाही. याचा सर्व निर्णय एकनाथ शिंदे घेतील. प्रत्येकवेळी चुकी करायची आणि त्यावर पांघरुन घालायचे मला वाटते ही नीती बरोबर नाही. यामुळे नाराजी वाढते, कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण होतो. नगराध्यक्ष पदाचा उमेदवार कोणत्या खुशीने भाजपसोबत गेला त्यांच्यावर काय दबाव होता. गंगापूर, वैजापूर, रत्नपूरमध्येही जर हेच सुरू असेल तर महायुती म्हणून रोल काय? म्हणून हे थांबले पाहिजे. या निवडणुकीचा परिणाम येणाऱ्या मनपा आणि जिल्हा परिषद निवडणुकीवर होऊ शकतो असा इशाराही शिरसाट यांनी दिला आहे.

संजय शिरसाट म्हणाले की, प्रत्येक पक्ष जर पूर्वतयारी म्हणून हे लोक फोडायचे त्या पक्षाचे लोक फोडायचे असे करत असेल तर महायुती म्हणून निवडणूक लढवता येणार नाही. यावर काय व्यक्त व्हायचे याचा निर्णय एकनाथ शिंदे, अजित पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला पाहिजे. रोज जर फोडाफोडी वर बोलायचे की प्रचार करायचा यावर काही ठरले पाहिजे.

संजय शिरसाट म्हणाले की, अजित पवार अर्थमंत्री असल्याने निधीबाबत त्यांना अधिकार असतात. पण मुख्यमंत्री हे मुख्यमंत्री असतात. त्यांच्याकडे सर्व अधिकार असतात हे निर्विवाद आहे ते नाकारता येत नाही. तिजोरीच्या चाव्या कुणाकडेही असो मालक कुणीही असे पण खर्च कसा करायचा हे सर्वांना सोबत घेत ठरवले जाते. तिजोरीतून आम्हाला जे हवे आहे ते आम्ही घेत असतो निधी कमी पडला तर यावर आम्ही भाष्य करु.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २६ नोव्हेंबर २०२५

## मनातील प्रश्नांचे निरसन : इकरा पब्लिक शाळेत शिक्षक - पालक मेळावा उत्साहात संपन्न







**जळगाव :** इकरा पब्लिक शाळेत नुकताच पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला. पालक मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी डॉ. करीम सालार होते.मेळाव्याची सुरुवात कुराण पठणाने करण्यात आली.यावेळी अनेक महत्त्वाच्या विषयावर चर्चा झाली.डॉ.करीम सालार यांनी आपल्या भाषणात पालक मेळावा हा शिक्षक-पालक-विद्यार्थी नाते घट्ट करण्याची सुवर्णसंधी असते असे मेळावे आयोजित करणे हे काळाची गरज आहे असे नमूद केले.डॉ.नसीर शाह(पंजाब) यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की माता ही जगात क्रांती घडवू शकते, कारण ती केवळ मुलांचे पालनपोषणच नाही, तर सामाजिक बदल घडवून आणते आणि कुटुंबाच्या भवितव्याला आकार देते मुख्याध्यापक शेख शकील यांनी लाभार्थी विद्यार्थ्यांच्या समाजकल्याण शिष्यवृत्ती प्रस्तावासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे,मिशन आरंभ शिष्यवृत्ती परीक्षा व इतर खाजगी स्पर्धा परीक्षा या विषयांवर मार्गदर्शन केले.विद्यार्थी गुणवत्तेसाठी पालक-शिक्षक-विद्यार्थी त्रिकोण महत्वाचा असल्याचे नमूद केले. मोहसीन खान यांनी शिष्यवृत्ती परीक्षा संबंधित सखोल माहिती दिली.शिक्षिका जिया उन निसा यांनी विद्यार्थ्यांची वैयक्तिक स्वच्छता,आहार व आरोग्य या बाबींवर मार्गदर्शन केले. इश्तीयाक सर यांनी विविध प्रकारच्या परीक्षा संबंधित मार्गदर्शन केले.पालक हिमायु शेख यांनी गुरूंचे जीवनातील महत्त्व सांगितले.पालक मेळाव्याला डॉ.नसीर शाह,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष डॉ.करीम सालार, एजाज मलिक ,शेख रशीद व इकरा शिक्षण संस्था चे सर्व सदस्य उपस्थित होते. सूत्रसंचालन आरीफ खान यांनी केले व दानिश अहमद यांनी सर्वांचे आभार मानले.

## कन्नड नगर परिषद उमेदवार दारोदारी, मतदारां 'देखल्या देवा दंडवत'

**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड नगर पालिका निवडणूक प्रचाराचा धुराळा उडाला असून नेत्यांचे आरोप प्रत्यारोप, उणीधूनी, मतदारांची मनधरणी आणि सोशल मिडीयात कार्यकर्त्यांचा बीन पाण्याचा शमगा सुरु केला आहे.दि. ०२ डिसेंबर रोजी होणाऱ्या नगर परिषद मतदाना साठी सर्वच पक्ष, आघाडी, युत्यांनी जोर लावला आहे. या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी- स्वाती संतोष कोल्हे(राष्ट्रवादी), अनिता काकासाहेब कवडे (शिवसेना), शेख फरीन बेगम अब्दुल जावेद( कांग्रेस), शेख सलमाबी चांद रिंगणात आहेत. तर नगरसेवक पदासाठी ८६ उमेदवार नशिब आजमावत आहेत. राजकारणात कोणी कोणाचा कायमचा शत्रु अथवा मित्र नसतो याचा प्रत्यय बघायला मिळत आहे. काल एका पक्षात आज दुसऱ्या पक्षात अशी बहुतांश उमेदवारांची अवस्था आहे.गेल्या नगर परिषद निवडणूकीत आमने सामने राहिलेल्या संतोष कोल्हे व भाजप या निवडणुकीत मैत्री चा हात देत एकत्रीतपणे निवडणूक लढवित आहेत. आमदारकी बरोबरच बाजार समिती, खरेदी विक्री संघा वरती वर्चस्व मिळविलेल्या आ. संजनाताई जाधव अर्थात शिवसेनेने स्वतंत्र पॅनल उभारत दंड थोपटले आहेत. त्यामुळे विधान सभा निवडणूक आनंदाने एकत्रित लढविलेल्या सेना- भाजप नेत्यांत शाब्दिक खटके उडाले आहेत. याचे प्रतिबिंब सोशल मिडीयात ही उमटत आहेत. विधानसभा निवडणूकीत केलेली मदत आणि नगर परिषदेत मिळालेला धोका याची सल भाजप कार्यकर्ते आपल्या नेत्यांसमोर व्यक्त करित आहे. तगड्या उमेदवार मुळे कांग्रेस जोमात आहे. त्यामुळे तिरंगी लढत बघायला मिळत आहे. या सर्व धामधुमीत उमेदवार मात्र निमुटपणे आपला प्रचारात गुंतले आहेत. कन्नड शहरातील पाणी पुरवठा, स्वच्छता, आदी मुद्दे उपस्थित होत असतांना सामाजिक व धार्मिक कंगोरे ही पक्ष नेते, उमेदवारांना जाचत आहेत. सध्यातरी सर्वच पक्षांनी प्रचारात आघाडी घेतल्याचे चित्र दिसत आहे.नगर पालिका निवडणूकीत महायुती चे आपसात बिनसल्याने याचा थेट परिणाम आगामी जि.प. पंचायत समिती निवडणुकीत ही जाणवणार आहे.

## मनपा केंद्रीय विद्यालयात आरोग्य जागरूकता उपक्रम पार



छत्रपती संभाजीनगर : मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथे आरोग्य जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.संत रोहिदास आरोग्य केंद्र व सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ यांच्या वतीने आयोजित या उपक्रमामध्ये आर के दमानी मेडिकल कॉलेजचे मेडिकल सोशल वर्कर श्री. राजेंद्र राक्षे आणि प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर श्री. विनोद सोनकांबळे यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक महत्त्वपूर्ण माहिती दिली.कार्यक्रमात विविध आजारांची ओळख, त्यांचे प्रतिबंधक उपाय, दैनंदिन स्वच्छतेचे महत्त्व, आरोग्य टिकवण्यासाठी आवश्यक सवयी तसेच निरोगी जीवनशैलीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमादरम्यान विचारलेल्या शंकांची समाधानकारक उत्तरे तज्ज्ञांनी दिली.या उपक्रमास शाळेचे मुख्याध्यापक श्री. चौधरी सर व सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण होण्यासाठी हा कार्यक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २६ नोव्हेंबर २०२५


## मुरूम पालिका निवडणूक- माजी मंत्री बसवराज पाटील यांचा मतदारांशी संवाद



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मुरूम पालिका निवडणुकीच्या अनुषंगाने भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ मंगळवारी (दि २५) शहरात ठिकठिकाणी कॉर्नर बैठकांचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी माजी मंत्री तथा लातूर जिल्हा भाजप अध्यक्ष बसवराज पाटील यांनी शहरातील डॉक्टर, व्यापारी, आडत व्यापारी यांच्याशी संवाद साधत पालिका निवडणुकीत भाजप उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन केले. यावेळी पालिकेचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बापूराव पाटील,माजी सभापती मदन पाटील,बाजार समितीचे संचालक सुरेश मंगरुळे,आडत व्यापारी संघटनेचे अध्यक्ष बालाप्रसाद काबरा,डॉ नितीन डागा,डॉ शिवशंकर कारडामे,डॉ शिवराज हळे,रोटरीचे अध्यक्ष आप्पासाहेब सूर्यवंशी,सुनील राठोड, आयुब मासुलदार,गोविंद पाटील, नीलकंठ कोटरगे, आप्पासाहेब पाटील,विकास चौधरी, मल्लिनाथ मुदकना आदींसह भाजपचे नगरसेवक पदाचे उमेदवार उपस्थित होते. यावेळी बोलताना पाटील म्हणाले की,गेल्या अनेक वर्षांपासून पालिकेच्या माध्यमातून बापूराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली शहरात दर्जेदार रस्त्यांची कामे झाली आहेत.शहरवासीयांना पाण्याची सुविधा आहे.शहरात स्वच्छता आहे.आताच्या निवडणुकीत बापूराव पाटील स्वतः उमेदवार आहेत.यामुळे या विकास कामांची पोहचपावती म्हणून बापूराव पाटील यांना निवडून देण्याचे आवाहन केले.

## कन्नड वनविभागाच्या वतीने चिकलठाण परिसरात जनजागृती




**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड प्रादेशिक वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी शिवाजी टोंम्पे नेतृत्व व मार्गदर्शनात तसेच वनपाल अण्णा वाघ यांच्या नियोजनात दि.२५ नोव्हेंबर रोजी चिकलठाण ता.कन्नड परिसरात जनजागृती करण्यात आली. नियतक्षेत्र चिकलठाण अंतर्गत निमडोंगरी गाव व जि.प. प्रा. शाळेत विद्यार्थ्यांशी संवाद साधत वन्यजीवां बद्दल असलेले गैरसमज दूर केले. तसेच बिबट या प्राण्यांबद्दल माहिती देण्यात आली. बिबट प्राण्यांनी भीती न बाळगता सावधगीरी बाळगावी. महिला, पुरुष, जेष्ठ नागरिक लहान मुलांनी रात्री च्या वेळी जंगल झाडी शेत शिवारात एकटे फिरु नये. समोर बिबट्या दिसल्यास घाबरुन न जाता आरडा ओरडा करावा. शेतात फिरतांना सोबतीला एक दोन माणसे असु द्यावीत. मोबाईल वरती गाणी वाजवीत किंवा आपसात गप्पा माराव्यात जेणे करुण बिबट्याला माणसाची चाहूल लागल्यास तो तेथून निघून जाईल. त्यावरती हल्ला न करता वनविभागाला कळवावे असे अवाहन यावेळी करण्यात आले. तसेच वनरक्षक वडाळी, जैतखेडा, साळेगाव, हिवरखेडा यांनी आप आपल्या कार्यक्षेत्र परिसरात जनजागृतीपर पोस्टर, भित्तीचित्रे लावून माहिती दिली.या वेळी वनपरिक्षेत्र अधिकारी शिवाजी टोंम्पे, वनपरिमंडळ अधिकारी अण्णा वाघ, वनरक्षक सोमनाथ वाघ, राम जाधव, रविंद्र गायकवाड, गोपाल ननवरे, हरिचंद्र वाघ यांचे सह जि.प.प्राशा निमडोंगरी चे मुख्याध्यापक बी.ए.खैरनार, शिक्षक ए.आर.जाधव, बी.एम. सोनावणे, डी.बी.घरटे, श्रीमती डी.के.कोल्हे, सरपंच वाल्मिक गावंडे, आप्पाराव गुळवे, कल्याण गुळवे, बळीराम गावंडे, कृष्णा गुळवे, सचिन बोराडे, अमोल रानमळे, आदी उपस्थित होते.

## कन्नड येथे लोकनेते बाळासाहेब पवार अभिवादन सभा संपन्न



**कन्नड :** लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांचे महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सहकार, शिक्षण आणि औद्योगिक क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान होते. त्यांनी मराठवाड्याची अस्मिता व विकासाची भूमिका घेऊन सतत संघर्ष केला. सामान्य माणसाला पद, सत्ता देऊन त्यांनी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. नेते घडविणारे ते खऱ्या अर्थाने लोक विद्यापीठ होते असे प्रतिपादन कन्नड येथे (ता. 25 ) लोकनेते बाळासाहेब पवार चौक येथे अभिवादन सभेत मान्यवरांनी केले. यावेळी आ. संजनाताई जाधव, श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव चंद्रकांतराव देशमुख, , डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. ए.के. महाले, ॲड. कृष्णा जाधव, संतोष कोल्हे, संस्थेचे संचालक कृष्णा पा. निकम, विशाल आहेर, यांच्यासह टी. एस. कदम, नामदेवराव लवांदे, विठ्ठलराव जाधव, कौतिकराव पवार, वाल्मिक लोखंडे, शिंदे काका, राम पवार, राजेंद्र नलावडे,भरत जाधव, , प्राचार्य डॉ विजय भोसले , उपप्राचार्य डॉ भाऊसाहेब मगर, उपप्राचार्य अभय आहेर, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. राहुल क्षिरसागर, मुख्याध्यापक भुसारे मॅडम , विलास पवार, योगेश कोल्हे, बाबुलाल काळे, संजय जाधव, अरविंद कांबळे, अनिल गायकवाड , दिपक ताठे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते यांची मोठया संख्येनी उपस्थिती होती.सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालय, कन्नड , सावित्रीबाई फुले विद्यालय कन्नड, शिवाजी महाविद्यालय कन्नड , श्री छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ फार्मसी कन्नड येथेही मान्यवरांच्या उपस्थितीत लोकनेते बाळासाहेब पवार यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २६ नोव्हेंबर २०२५

# २६/११ : सामान्य नागरिकाच्या मनातली न पुसणारी जखम

२६/११ : सामान्य नागरिकाच्या नजरेतून—आघात, सत्य आणि आपण घेण्याचे धडेमुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेले दहशतवादी हल्ले हे स्वतंत्र भारताच्या आधुनिक इतिहासातील सर्वात भीषण आणि दीर्घकाळ स्मरणात राहणारे अध्याय आहेत. साधारणपणे दैनंदिन जीवन शांतपणे पुढे सरकत असताना अचानक त्या संध्याकाळी देशाला एका अनपेक्षित भीतीच्या गर्तेत ढकलले गेले. सामान्य नागरिक म्हणून आजही त्या घटना आठवल्या की मनात वेदना, संताप, आणि सुरक्षा—जागरूकतेची नवी जाणीव निर्माण होते.घटना आणि आघात : नागरिकांच्या मनातली जखमताज, ओबेरॉय ट्रायडंट, लिओपोल्ड कॅफे, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस—ही ठिकाणे फक्त पर्यटन वा व्यावसायिक केंद्रे नव्हती; ती दैनंदिन जीवनाचे प्रतीक होती. त्यामुळे त्या ठिकाणी झालेल्या अंधाधुंद गोळीबाराने संपूर्ण देशाचे मन हादरले.या हल्ल्याने नागरिकांना एक गोष्ट स्पष्टपणे जाणवली—दहशतवाद हा फक्त सीमारेषेवरचा प्रश्न नसून तो थेट प्रत्येक भारतीयाच्या सुरक्षिततेवर घाला घालणारा आहे.आरोपींचा निर्दयीपणा आणि दहशतवादाची वक्र मनोवृत्तीअजमल कसाब आणि त्याच्यासोबत भारतात घुसविण्यात आलेल्या अतिरेक्यांनी दाखवलेली क्रूरता ही काट्यावर कायदे—व्यवस्थेचीच नव्हे तर मानवी मूल्यांचीही कसोटी होती. निष्पाप पर्यटक, रोजची कमाई करणारे कामगार, रेल्वेने घरी जाणारे सामान्य लोक—त्यांना लक्ष्य करण्यात आले.सामान्य नागरिक म्हणून आश्चर्य वाटते की मानवी जीवनाचे इतके अवमूल्यन एखाद्या व्यक्तीच्या मनात कसे निर्माण झाले असेल?सीमेपलीकडील वास्तव व भारतीय सुरक्षेचे आव्हानया हल्ल्यांअंतर्गत कार्यवाही, नियोजन आणि प्रशिक्षण हे भारताबाहेरून झाल्याचे तपास यंत्रणांनी उघड केले.सीमापार तळांवरील छुपे पाठबळ, देशाविरुद्ध राबवली गेलेली द्वेषयुक्त दहशत धोरणे—या सर्वांनी सामान्य नागरिकांच्या मनात एकच प्रश्न निर्माण केला:आपण शांततेवर विश्वास ठेवताना दुसरी बाजू त्याचा फायदा तर घेत नाही ना?हे राजकीय द्वेषाचे नव्हे, तर सुरक्षाविषयक वास्तवाचे विश्लेषण आहे.शहीदांचे अद्वितीय बलिदान : एक नागरिक म्हणून आमचे मस्तक नमतेत्या काळोख्या रात्री जे निर्णय घेतले गेले, जे धैर्य दाखवले गेले, त्याला तोड नाही.शहीद तूकाराम ओंबळे, हेमंत करकरे, अशोक कामटे, विजय साळस्कर, संजीव उन्नीकृष्णन, गजेंद्रसिंग आणि अनेक जवान—यांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता शेकडो नागरिकांचे जीवन वाचवले.ओंबळे यांनी कसाबला जिवंत पकडण्यासाठी आपले जीवन अर्पण केले—हे धैर्य आजही सामान्य नागरिकाला प्रेरणा देते.त्यांच्या कुटुंबीयांची मानसिक स्थिती—अनंत अभिमान, पण न संपणारी पोकळी—हे आपण विसरतो का? राष्ट्र म्हणून त्यांच्या बलिदानास आपण किती न्याय देतो, हा प्रश्न नागरिक म्हणून मनात सातत्याने उभा राहतो.कुटुंबीयांची मानसिक वेदना : एका सामान्य माणसाची वेदनादृष्टीहल्ल्यानंतर शहीद कुटुंबीयांना मिळणारी मदत, सन्मान आणि रोजगाराच्या हमी याबद्दल अनेक सकारात्मक पावले उचलली गेली, परंतु काही ठिकाणी प्रक्रिया मंदावणे, कागदोपत्री विलंब, आणि दीर्घकालीन मानसिक आधाराची कमतरता जाणवते.एक नागरिक म्हणून मला वाटते—शहीद कुटुंबीयांचा सन्मान हा केवळ पुरस्कारांनी नाही, तर सातत्याने दिल्या जाणाऱ्या आधाराने सिद्ध होतो.शासनाची धोरणे—शिक्षण, सुधारणा आणि नागरिकांची अपेक्षाया हल्ल्यानंतर दहशतवादविरोधी पथके, तंत्रज्ञान, सागरी सुरक्षा, प्रशिक्षण पद्धती आणि गुप्तचर प्रणाली यांत अनेक सुधारणा झाल्या.आपल्यासारख्या नागरिकांना ही अपेक्षा आहे की या सुधारणा सतत अद्ययावत राहाव्यात आणि त्यात शिथिलता येऊ नये.कारण धोक्याचे स्वरूप बदलत असते, आणि सुरक्षा व्यवस्था सतत जागरूक असणे हीच शहीदांच्या बलिदानाला खरी आदरांजली आहे.या हल्ल्यातून सामान्य नागरिकाने काय शिकले?१. सुरक्षा ही सर्वांची जबाबदारी आहे. संशयास्पद हालचालींबद्दल जागरूकता आवश्यक.2. एकता ही सर्वात मोठी शक्ती आहे. हल्ल्यादरम्यान दाखवलेली मुंबईची एकजूट अद्वितीय होती.3. दहशतवादाची लढाई लांब पल्ल्याची आहे. केवळ सैन्य किंवा पोलीस नव्हे—संपूर्ण समाजाची सहकार्यता आवश्यक.4. शहीद परिवारांविषयीची कृतज्ञता कृतीतून दिसली पाहिजे.5. हिंसेला पोषक विचारसरणी नष्ट करणे हे शिक्षण, संवाद आणि जनजागृतीतूनच शक्य.समारोप : २६/११ आपल्याला सावध करते, मजबूत बनवतेएक सामान्य नागरिक म्हणून माझे मत इतकेच—२६/११ ही फक्त एक तारीख नाही; ती आपल्याला वारंवार आठवण करून देणारी चेतावणी आहे की स्वातंत्र्य, शांतता आणि सुरक्षेची किंमत फार मोठी असते. त्या किंमतीत आपले जवान आपले प्राण देतात, आणि आपण नागरिक म्हणून जागरूकता, एकता आणि जबाबदारीने त्यांचे बलिदान सार्थ करतो.



**संदीप वाकडे पाटील श्री**
मती कस्तुरबा इंग्लिश स्कूल चापानेर,
कन्नड जि. छ. संभाजीनगर
9766992776

## जाऊळका शिवारातील २९ लाखांच्या फसवणुकीचा परदाफाश.. दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल,

**बुलढाणा (महेश मुंढे) :** सिंदखेड राजा तालुक्यातील जऊळका नगरमाळ येथील शेतकऱ्यांची तब्बल रु. २९,६१,९८५/- ची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी दोघां विरुद्ध किनगाव राजा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे फिर्यादी रामेश्वर कारभारी सांगळे वय ४२ रा. जऊळका यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ही कारवाई करण्यात आली आरोपी प्रल्हाद आश्रुबा जायभाये व पवन प्रल्हाद जायभाये दोघेही रा. लिंगा ता. सिंदखेड राजा यांचे विरुद्ध कलम ३१६(५),३१८(४),३(५)BNS २०२३ नुसार गुन्हा क्रमांक ३०३/२०२५ दाखल करण्यात आला. व्यापारी पिता-पुत्र यांनी स्वतःला अधिकृत अडत परवानाधारक असल्याचे भासवून फिर्यादी रामेश्वर सांगळे व इतर २८ शेतकरी यांचेकडून शेतमाल विकत घेतला परंतु प्रत्यक्षात त्यांच्याकडे कुठलाही परवाना नव्हता रामेश्वर सांगळे व इतर २८ शेतकरी यांचा शेतमाल एकूण अंदाजे रक्कम २९ लाख ६१ हजार ९८५ चा शेतमाल आरोपी पिता पुत्रांनी उचलून सदर रक्कम स्वतःच्या फायद्यासाठी वापरली, वारंवार मागणी करूनही रकमेची परतफेड न केल्याने हे प्रकरण सरळ सरळ आर्थिक फसवणुकीचे असल्याचे तपासत स्पष्ट झाले, शेतकऱ्यांच्या आलेल्या तक्रारीच्या आधारे श्री संजय मातोंडकर ठाणेदार पोलीस ठाणे किनगाव राजा यांनी तपास पूर्ण करून वरिष्ठांना अहवाल पाठवीला होता, त्यावरून माननीय पोलीस अधीक्षक बुलढाणा यांनी पुन्हा दाखल करण्यास मंजुरी दिली. मंजुरी मिळताच २३ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला गुन्हा दाखल अधिकारी म. पो. हे. कॉ. सोनल चव्हाण ( ब. नं. १७६३) व तपास अधिकारी पो. उप. नी. मोहन गीते पोलीस ठाणे किनगाव राजा यांचे मार्फत तपास सुरू असून इतर शेतकऱ्यांची साक्ष नोंदविण्यात आली आहे.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा
पॅरामेडिकल कॉलेज.
बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक,
आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य
Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे,
हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा,
छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २६ नोव्हेंबर २०२५


# सहकार महर्षी बाळासाहेब पवार संगीत महोत्सवातून उत्तमोत्तम कलावंत घडतील - डॉ. सोमनाथ खाडे



**कन्नड : (प्रतिनिधी )** सहकार महर्षी बाळसाहेब पवार यांचे नाव आजही महाराष्ट्रात आदराने घेतले जाते. अनेक संस्था, कार्यकर्ते, नेते घडविण्याचे काम त्यांनी अविरत केले. आपल्या तत्वाशी तडजोड न करणारे ते लोकनेते होते. या वाचनालयाच्या माध्यमातून दुर्लक्षित कलावंतांना मोठे व्यासपीठ मिळवून देत आहेत. या संगीत महोत्सवातून पुढे आलेले कलावंत देशभर नाव लौकिक मिळवतील. विद्यार्थी कलावंतानी या महोत्सवाचा लाभ घ्यावा. यातून उत्तमोत्तम कलावंत घडतील .असे संगीत महोत्सव हे गावोगावी झाले पाहिजे, त असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सोमनाथ खाडे यांनी केले. (ता. 25 ) संगीत महोत्सवाचे उदघाटन त्यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते. मंचावर परिक्षक प्रा. गणेश दळे, प्रा. राहुल शिंदे, तन्मय अवसरमल यांची उपस्थिती होती.येथील सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालय, कन्नड व बाळासाहेब पवार फाऊंडेशन तर्फे लोकनेते बाळासाहेब पवार यांच्या पुण्यतिथी निमित्त दरवर्षी सहकार महर्षी बाळासाहेब पवार संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. महोत्सवाचे हे चौथे वर्ष असून कन्नड तालुक्यातील विद्यार्थी कलावंताच्या प्रतिभेचा शोध घेऊन त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळून सादरीकरणास संधी मिळावी या उद्देशाने हा महोत्सव आयोजित करण्यात येतो. यावर्षी 90 संघांना संधी दिली असून हा महोत्सव स्पर्धात्मक आहे दोन दिवस चालणाऱ्या (25 व 26 ) समुह गायन, समुह नृत्य, एकल गायन, एकल नृत्य या कलाप्रकारात सादरीकरण होणार आहे. पहिल्या दिवशी उत्तमोत्तम सादरीकरण संघांनी केले. या कार्यक्रमास वाचनालयाचे अध्यक्ष, तथा श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष , उद्योजक मानसिंह पवार, डॉ. भि. आं.कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. ए.के. महाले, डॉ. के. एल. भानुसे, ॲड. कृष्णा जाधव, प्राचार्य डॉ. विजय भोसले, डॉ. रुपेश मोरे, प्राचार्य डॉ. राहुल क्षिरसागर, उपप्राचार्य भाऊसाहेब मगर,अरुण देशमुख, रामकृष्ण पवार, रामराव शिंदे,संजय जाधव, श्याम खोसरे, विलास पवार, रामेश्वर मोरे, प्रा. हुकुमचंद पवार, प्रा. राजेश नागे, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे, प्रा. संतोष देशमुख, ज्ञानेश्वर भवर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी, महिला , नागरिक यांची मोठ्या संख्येनी उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. के. एल. भानुसे यांनी केले.

# संविधान

भारतीय संविधान
साऱ्या विश्वात महान
विविधतेत एकता
हीच भारताची शान

भारतीय संविधान म्हणजे
सर्व घटकांचा विकास
न्याय, स्वातंत्र्य, बंधुता
ही संस्कृतीची कास

संविधानाने आपणास दिला
समतेचा अधिकार
गुलामगिरीच्या पाशावर
केला प्रखर वार

माणूस म्हणून सर्वांना
दिला जगण्याचा अधिकार
कायमचा दूर झाला
विषमतेचा अंधकार

दीन दुबळ्यांना आरक्षण
स्त्रियांना सुरक्षेची ढाल
स्वातंत्र्याचा हक्क देऊनी
केले शिक्षण बहाल

बाबासाहेब आंबेडकर
संविधानाचे थोर शिल्पकार
संविधानाचा आदर करूनी
लावू प्रगतीला हातभार




**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ मो.९०११५५९१०६



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.


# दत्तु चव्हाण ने केली शिवीगाळ जीवे मारण्याच्या आदिवासी ठाकर ऊसतोड कामगार महिलांना दिल्या धमक्या




**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** आदिवासी ठाकर समाज हा ऊस तोडीवर उपजीविका भागवत असतो दरवर्षी आपली पोटाची खळगी भरण्यासाठी वेगवेगळ्या जिल्ह्यांतून ऊसतोडी साठी जातो तसेच यावर्षी सुद्धा काळदरी धामणडोह शिबघाट निरगुडी बु ठाकरवाडी गणेशनगर या गावातील आदिवासी ठाकर ऊसतोड कामगार मोठ्या संख्येने ऊसतोडी साठी वडाळी गंधेश्वर येथे आहे आदिवासी ऊसतोड कामगार हा कन्नड व खुलताबाद हद्दीतील वडाळी गंधेश्वर या गावांच्या शिवारात ऊस तोडीसाठी त्यांचे अड्डे खोप्या वास्तव करुन आहेत ज्या ऊसतोड कामगारांना शिविगाळ व जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या तो कामगार सचिन भोसले या मालकाकडे आहे दत्तू चव्हाण हा राहणार चिकलठाण तालुका कन्नड जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी असून हा दरवर्षी ऊसतोड कामगार त्यांच्याकडे आणत असतो ऊस तोडी कामगारांकडून असे सांगण्यात आले की दत्तू चव्हाण हा ऊसतोड मालक गेल्या तीन वर्षापासून ऊसतोड कामगारांना शिवीगाळ करतो जीवे मारण्याच्या धमक्या देतो दि १८ नोव्हेंबर रोजीपासून एक दोन दिवस आड ऊसतोड कामगारांना शिवीगाळ व मारण्याच्या धमक्या देत आहे व दिनांक २३ नोव्हेंबर रविवार रोजी पुरुष ऊसतोड कामगार चिकलठाण येथे आठवडी बाजार ला गेले व दत्तू चव्हाण ऊसतोड कामगार मालक त्यांच्या अड्ड्यावर जाऊन काही कारण नसतांना महिलांना शिवीगाळ व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या असे ऊसतोड कामगारांनी सांगितले सोमवार रोजी आदिवासी ठाकर समाज नांदगाव खुलताबाद कन्नड सोयगाव या तालुक्यातून पोलीस स्टेशन कन्नड ग्रामीण येथे ॲट्रॉसिटी गुन्हा दाखल करण्यासाठी ४०० ते ५०० च्या संख्येने आदिवासी समाज जमा झाला होता पण चिकलठाण वडाळी या गावातील शेकनाथ मामा व इतर प्रतिष्ठित व्यक्ती गावकऱ्यांच्या विनंतीला मान देऊन कोणताही गुन्हा न नोंदवता करवंदे साहेब पोलीस अधिकारी यांच्या समक्ष त्याने चूक कबूल करुन लेखी स्वरूपात जबान दिली त्याचबरोबर पाच वडाळी चिखलठाण चे गावकरी साक्षीदार म्हणून करवंदे पोलीस अधिकारी यांनी सह्या घेतल्या आणी सर्व आदिवासी महिला व बांधवांची हात जोडून माफी मागितली व माझ्याकडून इथून पुढे अशी चूक होणार नाही अशी कबुली दत्तु चव्हाण ने दिली.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २६ नोव्हेंबर २०२५

# भारतीय राज्यघटना आणि त्यापुढील आव्हाने

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय राज्यघटना ही भारत देशास अर्पण केली. या घटनेला यावर्षी(२०२५) ७६ वर्ष पूर्ण होत आहे. भारतीय संविधांनामुळे येथील अनेक नागरिकाच्या जीवनात आमुलाग्र सकारात्मक बदल घडून आला आहे. त्यांचे राहणीमान उंचावले आहे. एकंदरीत भारताच्या विकासात भारतीय संविधान फार महत्त्वाची भूमिका बजावत आहे. भारताची अखंडता, एकता आणि विविधता भारतीय राज्यघटनेमुळे स्थिर असून ती येथील प्रत्येक नागरिकास स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायाची हमी देते. भारतात विविध जाती, धर्म, प्रांत, भाषा असून सुद्धा सर्वांना एकसंघ ठेवण्याचे काम भारतीय राज्यघटना करीत आहे. भारतीय राज्यघटनेमुळेच भारत अवकाश संशोधन, शेती, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती करीत आहे. जागतिक पातळीवर भारत एक विकसित देश म्हणून पुढे येत आहे. स्वातंत्र्या नंतर इतक्या साऱ्या समस्या असताना गेल्या ७५ वर्षात भारताने केलेली प्रगती वाखणण्याजोगी आहे. भारतीय राज्यघटना ही फक्त एक कायद्याचे पुस्तक नसून ती येथील सर्व लोकांच्या न्याय, हक्क आणि स्वातंत्र्यासाठी जगण्याचा श्वास आहे. तो एक आदर्श जीवन जगण्याचा मार्ग आहे. असे असले तरीही भारतीय संविधांन आज अनेक आव्हानांना सामोरे जात आहे.टोकाची धार्मिकता, संविधांनाबाबतीत लोकांची निरक्षरता, निवडणुकीतील भ्रष्टाचार, सत्तेचा गैरवापर, आर्थिक असमानता, राज्यकर्त्यांची विकोपाला गेलेली नीतीमत्ता आणि प्रामाणिकपणा भारतीय समाज माध्यमाची दुटप्पी भूमिका आणि न्यायव्यवस्थेची अपारदर्शकता यामुळे लोकशाही कमकुवत होताना दिसत आहे. भारतीय लोकशाहीवरील आपला विश्वास अधिक वृंदीगत करण्यासाठी आपल्याला तिच्या निर्मितीच्या इतिहासाची आणि भविष्यात येणाऱ्या आव्हानांची माहिती असणे गरजेचे आहे. दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटना ही देशास अर्पण केली आणि दिनांक २६ जानेवारी १९५० रोजी ती संबंध देशामध्ये लागू करण्यात आली. राज्यघटना तयार करण्यासाठी २ वर्ष ११ महीने १८ दिवस इतका प्रदीर्घ कालावधी लागला. संविधानाची भारतात अंमलबजावणी होऊन ७५ वर्ष पूर्ण झाले आहेत. भारतीय राज्यघटना जगातील सर्वात मोठी राज्यघटना आहे, ज्यामध्ये ४५० पेक्षा जास्त कलम आणि २५ पेक्षा जास्त अनुसूची (Schedules) आहेत. संविधान स्वातंत्र, समता, न्याय आणि बंधुतेची हमी भारतातील प्रत्येक नागरिकास देते. संविधानाने भारतातील प्रत्येक नागरिकास काही मूलभूत अधिकार दिलेले आहे आणि आपल्या कर्तव्याची जाणीवही करून दिलेली आहे. भारतीय राज्यघटनेमुळेच भारतातील लोकांचे राहणीमान उंचावत असून भारत देश विकसित होत आहे. भारताची एकता, अखंडता आणि धर्मनिरपेक्षता भारतीय राज्यघटनेमुळेच टिकून आहे. भारतात अनेक जाती, धर्म, पंत, भाषा, संस्कृती, आचार आणि विचार यामध्ये विविधतता असून सुद्धा राष्ट्र म्हणून सर्व एक आहेत. याचे एकमेव कारण काय असेल तर ती भारतीय राज्यघटना आहे. एकीकडे राज्यांराज्यामध्ये इतक्या जाती, धर्म, पंत, भाषा, संस्कृती, आचार विचाराची विविधता तर दुसरीकडे प्रचंड निरक्षरता, दारिद्य, गरीबी, विज्ञान तंत्रज्ञांनाचा अभाव असताना सुध्दा देशाला एकसंघ ठेवून समाजातील सर्व घटकांचा विकास साधने हे फक्त भारतीय लोकशाही मुळे शक्य झाले आहे. भारतीय राज्यघटनेला हे का शक्य झाले असेल? यावर एक कटाक्ष टाकला तर आपल्या लक्षात येईल की याची अनेक कारणे आहेत. स्वातंत्र्य भारताची राज्यघटना कशी असावी इथपासून तर ती कोणी तयार करावी, त्याची प्रक्रिया काय असावी या सर्व बाबीचा विचार येथे करण्यात आला होता. भारतीय राज्यघटना भारतीयांनीच तयार करावी हा सुद्धा एक महत्वाचा हेतु तेथे होता. भारतीय राज्यघटना इतकी मजबूत आणि सक्षम असण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे ती अशा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिली आहे ज्यांच्याकडे अफाट बुद्धिमत्ता होती. ज्या महापुरुषाचा अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाने "ज्ञानाचे प्रतीक" (Symbol of Knowledge) म्हणून गौरव केला त्या महापुरुषाच्या हातून निर्माण झालेली राज्यघटना ही एक अफाट कलाकृती आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटना लिहीत असताना जगातील सर्व राज्यघटनांचा अभ्यास केला होता. त्यांना भारतातील सर्व समाज घटक, राज्य आणि भौगोलिक घटकांची जाण होती. त्यामुळेच हे शक्य होऊ शकले. भारतीय संविधानाची आणखी एक ताकद म्हणजे ती तयार करताना संविधान सभेची निर्मिती आणि यामध्ये समाजातील सर्व घटकांचा समावेश ही होय. भारतीय राज्यघटना तयार करीत असताना लोकशाही प्रणालीचा वापर करून संविधान सभा अस्थीत्वात आली. भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये समजून घेण्यासाठी आपणास तिच्या निर्मितीचा इतिहास समजून घेणे आवश्यक आहे. दिनांक ९ डिसेंबर १९४६ साली संविधान सभेची स्थापना करण्यात आली. संविधान सभेच्या प्रत्यक्ष कामकाजाला दिनांक ९ डिसेंबर १९४६ रोजी सुरवात झाली. यामध्ये एकूण ३८९ सदस्य होते, त्यापैकी २९६ सदयस्य निवडून आले होते व ९३ सदस्य हे संस्थांनिकांचे प्रतींनिधी राहतील असे ठरले. २९६ पैकी २९२ ब्रिटिश प्रांत, ४ मुख्य ब्रिटिश केंद्रीय कमिशनर प्रांतातून निवडून दिले जातील असे ठरले. संविधान सभेमध्ये सर्व घटकांना सामावून घेण्यात आले. निवडुन येणाऱ्या २९६ सदस्यापैकी २१० सर्वसामान्य, ७८ मुस्लिम, शीख ४, व इतर ४ असतील असे ठरले. त्यानुसार निवडणूक होऊन कोंग्रेस ला २०८ , मुस्लिम लीग ७३, अपक्ष ८ आणि इतर पक्ष ८ असे प्रतींनिधी निवडुन आले. मात्र यानंतर मुस्लिम लीग ने घटना समिती मध्ये भाग न घेण्याचे ठरविले. घटनासमिती मध्ये एकूण २२ समित्या आणि उपसमित्यांची स्थापना करण्यात आली होती. डॉ. राजेंद्र प्रसाद हे संविधान सभेचे अध्यक्ष होते[११डिसेंबर१९४६] तर डॉ० बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष होते[२८ आगस्ट१९४७]. ३ जून १९४७ रोजी लॉर्ड माऊंट बटन प्लॅन नुसार भारताची फाळणी जाहीर करण्यात आली. यामुळे पश्चिम बंगाल,सिंध , बलुचिस्तान, वायवया सरहद्द प्रांत, पूर्व बंगाल आणि आसाम मधील सिल्हेट जिल्हा या प्रांतामधील घटना समिती सदस्याचे प्रतिनिधित्व रद्द झाले. त्यानंतर उर्वरित भागातील मुस्लिम लीग च्या सदस्यांनी कामकाजात भाग घेतला. तदनंतर ३१ ऑक्टोबर १९४७ रोजी घटना समितीची पुनर्रचना करून एकूण सभासद संख्या २९९ इतकी करण्यात आली. घटना समितीत एकूण १५ महिला सभासद होत्या तर अनुसूचीत जाती आणि जमातीची एकूण सभासद संख्या ही ३३ इतकी होती. संविधान सभेच्या मसुद्धा समिती मध्ये एकूण ७ सदस्य होते. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर- अध्यक्ष, एन गोपाल स्वामी अय्यांगर , कृष्णस्वामी अय्यर, साईद अहमद साद्दूल्हा, डॉ. के. एम. मुंशी, एन. माधव राव(बी एल मित्तल यांच्या राजीनाम्यानंतर), आणि टी. टी. कृष्णमाचारी (डी. पी. खेतान यांच्या मृत्यूनंतर). या समितीचे एकूण ११ सत्रे झाली, तीनवेळेस संविधनाचे समितीच्या सर्व सदस्यासमोर वाचन झाले[ पहिले वाचन: ४ नोवेंबर १९४८ ते ९ नोव्हेंबर १९४८; दुसरे वाचन: १५ नोव्हेंबर १९४८ ते १७ ओक्टोंबर १९४९; तिसरे वाचन:१४ नोव्हेंबर १९४९ ते २६ नोव्हेंबर १९४९]० या वाचणा दरम्यान भारतीय जनतेकडून ७३५३ सूचना/ तक्रारी आल्या, यापैकी २४७३ तक्रारींचे निर्वाचन करण्यात आले. भारतीय राज्य घटनानिर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महत्वपूर्ण योगदान आहे. मसुदा समितीत एकूण ७ सदस्य होते तरी काहीजण आजारी होते, काहीजण बाहेरगावी राहत होते तर काहींनी राजीनामा दिला होता. त्यामुळे सर्वभार डॉ. आंबेडकर यांच्यावर पडला. डॉ. आंबेडकरांची तब्येत ठीक नसताना सुद्धा आंबेडकरांनी हे धंनुष्य पेलले. बिहारी नारायण रायजादा यांनी ते हस्तलिखित केले. भारतीय राज्य घटनेत २२ भाग, ३९५ कलमे आणि ८ अनुसूचीचा समावेश होता. सध्या भारतीय राज्य घटनेत २६ भाग, ४५२ कलमे आणि १२ अनुसूचीचा(परिशिष्ट्ये) समावेश आहे. आतापर्यंत १०६ वेळा घटना दुरुस्त्या झालेल्या आहेत. लवचिकता हे ही एक घटनेचे मोठे वैशिष्ठ्ये आहे. भारतीय राज्यघटनेचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे ती संसदीय लोकशाही पद्धतीची प्रणाली स्वीकारते. यात सार्वभौम, लोककल्याणकारी राज्याचा आदर्श दिला आहे. ती जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना आहे. ज्यामध्ये राज्यांना आणि केंद्र सरकारला स्वतःची शक्ती आणि अधिकार आहेत आणि भारत एक संघराज्य आहे. राज्यघटनेत सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी 'समाजवाद', 'धर्मनिरपेक्षता' आणि 'लोकशाही' हे तत्त्वही दिले आहेत. भारतीय नागरिकांना मुलभूत अधिकार प्रदान करते, जसे की भाषेचा अधिकार, जीवन आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचा अधिकार, समानतेचा अधिकार, विचार, अभिव्यक्ति, विश्वास , श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य , दर्जाची व संधीची समानता इत्यादी. या व्यतिरिक्त भारतीय राज्यघटना राष्ट्राची एकता व एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रस्तापित करण्याचा निर्धार पूर्वक प्रयत्न करते. भारतीय राज्यघटना ही लिखित व जगातील सर्वात मोठी राज्यघटना असून त्यामध्ये ताठरता व लवचिकता यांचा योग्य समन्वय साधला आहे. लोककल्याणकारी, राज्यसंसदीय शासनपद्धती, मूलभूत हक्क, प्रौढ मताधिकार, संघराज्य शासनपद्धती, स्वतंत्र न्यायव्यवस्था ही काही राज्यघटनेची मूलभूत वैशिष्ठ्ये आहेत.भारतीय राज्यघटनेसमोरील आव्हानेभारतीय राज्यघटना ही इतर सर्व महत्वाच्या देशातील राज्यघटनाचा आणि येथील सर्व समाज, संस्कृती, आणि समस्यांचा अभ्यास करून तयार केलेली राज्यघटना आहे. त्यामुळे ती येथील सर्व सामाजिक समस्यावर आत्तापर्यंत प्रभावी ठरली आहे. भारतात २८ विविध राज्य असून ८ केंद्र शासित प्रदेश आहेत . तेथील भौगोलिक वातावरण पुर्णपणे विलग आहे. प्रत्येक राज्याची भाषा व संस्कृती भिन्न आहे. भारतात सर्व जाती आणि धर्माचे लोक प्रत्येक राज्यात विखुरलेले आहेत त्यामुळे येथील सर्व नागरिकांना एका समान विचारावर बांधून ठेवणे फार मोठे आव्हान आहे आणि या आव्हानास आपली भारतीय राज्यघटना समर्थपणे तोंड देत आहे. तरी देखील भारतीय राज्यघटनेसमोर खूप आव्हाने आहेत०संविधानिक साक्षरताभारतामध्ये बहुसंख्य, असा समाज आहे जो सुशिक्षित जरी असला तरी तो भारतीय राज्यघटनेच्या बाबतीत निरक्षर आहे. ज्या राज्यघटनेमुळे त्यांचे मूलभूत हक्क आबादीत आहे त्याचीच जाणीव त्यांना नाही. ही राज्यघटना एका अनुसूचीत जातीतील व्यक्तीने लिहिली आहे त्यामुळे ती आपली नाहीच असाही माननारा एक वर्ग आहे.आता तर ती आंबेडकरांनी लिहिली नाही असे ही काहीजण कांगावा करीत आहेत. भारतीय राज्य घटनेचे आणि त्यातील मूलभूत हक्काचे संरक्षण झाले तरच आपले आणि देशाचे भले होऊ शकते ही भावना जोपासणे गरजेचे आहे म्हणून येथील लोकाच्या मनामध्ये ती रूजली पाहिजे. यासाठी प्रत्येक नागरीकास संविधानिक साक्षर करणे गरजेचे आहे. लोकशाही राज्यात लोकांची भूमिका ही फार महत्वाची असते. ज्या देशातील लोक चांगले असतील, देशाप्रती प्रमाणिक असतील तेथे चांगले राज्यकर्ते निवडल्या जातील आणि जनतेच्या हिताचे लोककल्याणकारी सरकार अस्तीत्वात येईल आणि देशाचा विकास होईल. म्हणून शासन हे आपल्यासाठी असून आपल्यावर राज्य करण्यासाठी नाही हे सर्वप्रथम जनतेने लक्षात घेतले पाहिजे. सध्या देशातील वास्तविकता बघता हे मोठे आव्हान आहे.सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विषमताजातीभेद आणि अस्पृश्यता [सामाजिक विषमता]भारतीय समाजात जातिव्यवस्थेमुळे आणि अस्पृश्यतेमुळे मोठ्या प्रमाणात सामाजिक विषमता आहे. आज ही निवडणुकीत उमेदवाराची गुणवत्ता आणि योग्यता न बघता त्याची धर्म आणि जात बघितल्या जाते. भारतीय राज्य घटनेच्या कलम १५ अन्वये जातीवरून भेदभाव आणि कलम १७ अन्वये अस्पृश्यता पाळणे गैर असले तरीही, आज ही कॉर्पोरेट आणि सरकारी ठिकाणी आधुनिक भेदभाव जोपासला जातो. जसे की खाजगी आणि सरकारी क्षेत्रात मागासवर्गीय उमेदवारांना उच्स्थ पद न देणे. मुलाखतीत डावलणे, त्याचे मानसिक खच्चीकरण करणे इत्यादी. हाय प्रोफाइल सोसायटया मध्ये अनुसूचीत जाती आणि जमातीच्या लोकांना किरायने रूम न देणे. प्लॉट खरेदी न करू देणे. उच्चभ्रू हॉस्पिटल मध्ये गरीब अथवा खालच्या जातीतील लोकांना सेवा न देणे. आर्टिकल १४ प्रमाणे कायद्यासमोर सर्व समान असले तरीही प्रत्यक्ष अनुभव वाईटच आहेत. आज ही कित्येक ठिकाणी आदिवाशी, महिला आणि मागासवर्गीयवार अन्याय अत्याचार चे प्रमाण वाढत आहे. भारतीय राज्यघटना त्यावर उपाय म्हणून अनेक सामाजिक सुधारणा करीत असून आरक्षणाच्या प्रणालीची अंमलबजावणी करीत आहे. आरक्षण प्रणालीचा मुख्य उद्देश समता प्रस्थापित करण्याचा असला तरीही त्याकडे गरीबी हटविण्याचा कार्यक्रम म्हणून त्याकडे बघण्यात येत आहे हे मोठे दुर्दैव आहे. त्यामुळे प्रत्येक जात आरक्षणाच्या परिघात येऊ इच्छित आहे. आरक्षणामुळे जाती-जाती मध्ये भांडणे लागत आहे. सध्या जाती-जाती आणि धर्मा-धर्मामधील विषमता वाढत आहे. आणि ती रोखणे हे मोठे आव्हान आहे. आरक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोण केवळ आर्थिक विषमतेशी लावण्यात राजकीय पक्ष यशस्वी होत आहे. त्यामुळे धर्मनिरपेक्षता टिकविणे हे मोठे आव्हान आहे० आर्थिक विषमतागरीब आणि श्रीमंतांमधील मोठी आर्थिक तफावतही एक मोठे आव्हान आहे. गरीब आणखी गरीब आणि श्रीमंत अधिकच श्रीमंत होत आहे. याचा अर्थ गरीब खूप कमी कष्ट करीत आहे आणि श्रीमंत जास्त मेहनत करतो असा नसून पैस्याकडे पैसा पळत आहे असा आहे. त्याची अनेक कारणे आहेत. सक्षम लोक संघटित असून आपल्या हक्का प्रती जागरूक आहे. श्रीमंत लोक सरकारी योजनांचा आणि राजकीय सत्तेचा अधिक फायदा घेत आहेत. "गरीब भारत आणि रिच इंडिया" ही दरी दिवसेंदिवस वाढत आहे. राजकीय विषमता आणि अस्थिरता भारतीय राजकारण एक नव्या आव्हानाला सामोरे जात आहे . एकीकडे जो समाज लोकसंख्येने बहुसंख्य आहे आणि आर्थिक द्रुष्ट्या प्रबळ आहे. त्याकडेच सर्व सत्ता जात आहे. अल्पसंख्यांक समुदायाचे अथवा अस्पृश्य समुदायाचे प्रतींनिधी आरक्षणामुळे जरी निवडून जात असले तरीही त्यांच्याकडे सत्ता(Power) नसते कारण मुळातच प्रस्थापित पक्षा कडून अशा व्यक्तिला तिकीट देण्यात येते जो आपल्या समाजाच्या हक्काप्रती जागरुख नसतो अथवा कमकुवत असतो. मागासवर्गीय समाजातील व्यक्ति केवळ समाजाच्या मतावर निवडून येऊ शकत नाही त्यामुळे तो कमकुवत बनतो. यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्वतंत्र मतदार संघाची मागणी किती रास्त होती हे लक्षात येते. अशा दुसरीकडे जे अल्पसंख्यांक आहे त्यांच्या मूलभूत अधिकाराकडे दुर्लक्ष्य होत आहे. त्यांना सत्तेत वाटा मिळत नाही. जाती मध्ये छोटे छोटे जात पक्ष निर्माण होत असून समाज विखुरला जात आहे आणि लोकशाही मध्ये त्यांची ताकत कमी होत असून त्यांच्यावर अन्याय अत्याचार दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे बहुपक्षीय सरकार अस्तीत्वात येत असून राजकीय विषमता आणि अस्थिरता निर्माण होत आहे. भारतीय राजकारणात बहुसंख्य वाद आणि अल्पसंख्यावाद हा एक संवेदनशील विषय आहे. भारतात हिंदू धर्म बहुसंख्य आहे, तर इतर धर्म (जसे मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन, पारशी) अल्पसंख्य आहेत. काही गट 'हिंदु राष्ट्र' ची संकल्पना मांडतात, ज्यामुळे अल्पसंख्याक समुदायांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होते. राजकीय प्रतिनिधित्व, आणि सामाजिक न्याय यांसारख्या मुद्द्यांवरून या समुदायांमध्ये वाद निर्माण होतात.धार्मिक, प्रादेशिक आणि भाषिक तणाव:धार्मिकवाद भारतीय राज्यघटनेने धर्म निरपेक्षतता हे तत्व जरी मान्य केले असले तरी येथील जनता ती मान्य करायला तयार नाही. भारतात हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिचन, आणि बौद्ध धर्मीय लोक असून प्रत्येकाला आपल्या धर्माचा अभिमान आहे. भारतीय राज्यघटनेने कलम २५-२८ नुसार प्रत्येकाला आपल्या धर्माची पुजा, अर्चा, प्रचार आणि प्रसाराचे धर्मस्वातंत्र्य दिले आहे आणि इतर धर्माचा आदर राखण्यास सांगितले आहे० धर्म आणि जातिची मुळे भारतीय समाजात इयतकी रूजली आहेत की त्यामुळे भारतात अनेक समस्या निर्माण होत आहे. लोकशाहीतिल बहुमत गाठून सत्तेवर येण्यासाठी अनेक पक्ष भारतात जात आणि धर्माचा वापर करीत असून धार्मिक तणाव वाढवत आहे. धर्माला सत्तेपासून वेगळे राहावे लागेल तरच येथे लोकशाही आनंदाने नान्दु शकते. प्रादेशिक विषमता आणि भाषिक तणाव : भारतामध्ये प्रादेशिक विषमता (Regional Disparity) ही एक मोठी समस्या आहे याची अनेक कारणे आहेत. यात सामाजिक,आर्थिक, राजकीय, ऐतिहासिक आणि भौगोलिक घटकांचा समावेश होतो. ब्रिटिशांच्या राजवटीत काही प्रदेशांना झुकते माप मिळाले, तर काही प्रदेश दुर्लक्षित राहिले, ज्यामुळे असमान विकास झाला. काही प्रदेश नैसर्गिक संसाधनांनी समृद्ध आहेत, तर काही प्रदेशात संसाधनांची कमतरता आहे, ज्यामुळे विकासावर परिणाम झाला. हवामान, अतिवृष्टी, दुष्काळ किंवा डोंगराळ प्रदेशामुळे काही प्रदेशांमध्ये विकास करणे अधिक कठीण आहे तर काही प्रदेशामध्ये गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा जास्त आहेत, तिथे विकास जास्त आहे, तर इतरत्र कमी. शिक्षण आणि आरोग्य सुविधांच्या उपलब्धतेमुळे सुध्दा प्रादेशिक विकासावर परिणाम होतो. या विषमतेस केंद्र आणि राज्य सरकारांची धोरणे सुध्दा जबाबदार आहेत. याव्यतीरिक्त राजकीय इच्छाशक्ती आणि नेतृत्वाची भूमिका, लोकसंख्या,इत्यादी कारणांमुळे भारतातील विविध प्रदेशांमध्ये विकासाच्या दरात मोठी विषमता आढळते, ज्यामुळे सामाजिक आणि आर्थिक असमानता वाढते० हा प्रादेशिक असमतोल सुधारणे हे मोठे आव्हान आहे. भाषिक आधारावर राज्यांची निर्मिती झाली असली तरीही काही राज्ये भाषिक तणावामुळे आपापसात भांडत आहे. हिंदी भाषेला अधिकृत भाषेचा दर्जा देण्याच्या कारणावरून भारतातील दक्षिण आणि उत्तर राज्ये तणाव ग्रस्त आहेत तर काही राज्यामध्ये अंतर्गत एकच भाषा बोलण्यावरून वाद होत आहे. हा वाद टाळण्यासाठी भाषिक विविधतेला महत्त्व देणे आणि सर्व भाषांचा आदर करणे आवश्यक आहे०५. राज्यकर्त्यांची नीतीमत्ता: "संविधान कितीही चांगले असले तरी ते चालवणारे लोक वाईट असतील तर ते संविधान वाईटच ठरेल आणि संविधान कितीही कमकुवत असले तरी, ते चालवणारे लोक चांगले असतील तर ते संविधान चांगल्या प्रकारे चालू शकते.संविधानाची कार्यक्षमता पुर्णपणे त्याच्या मचकुरावर नसून,ते राबविणाऱ्या राज्यकर्त्यांवर असते" असे विधान डॉ आंबेडकरांनी आपल्या संविधान सभेतील अंतिम भाषणात केले होते. त्यामुळे राज्यकर्ते हे नीतिवान, चरित्र्यसपन्न, प्रमाणिक आणि निरपेक्ष भावनेचे असले पाहिजे तरच ते समाजातील प्रत्येक घटकास न्याय देऊ शकतील, म्हणून संसदेतील आणि विधान सभेतील प्रतींनिधी निवडत असताना लोकांनी काळजी घेणे गरजेचे आहे. ४. इतर आव्हाने:जनसंख्या: लोकसंख्या वाढ ही भारतातील एक मोठी समस्या आहे कारण लोकसंख्यावाढीमुळे इतर अनेक समस्या जन्माला येतात. सन २०११ च्या जनगणनेनुसार भारताचा लोकसंख्येच्या बाबतीत दुसरा क्रमांक होता तर चीनचा पहिला क्रमांक होता. स्वांतंत्र्यापूर्व काळात आपल्या भारत देशाची लोकसंख्या ३४ कोटी एवढी होती. स्वातनत्र्यानंतर देशाची लोकसंख्या झपाट्याने वाढली असून सन २०२३ च्या आकडेवारीनुसार भारत देश प्रथमस्थानी आला आहे. ह्या आकडेवारीनुसार भारताची लोकसंख्या १४३ कोटी आहे आणि १४१ कोटी असलेला चीन देश दुसऱ्या स्थानावर आहे. म्हणजेच लोकसंख्येच्याबाबतीत भारताने चीन देशाला मागे टाकले आहे. जगाच्या 18% टक्के एवढी लोकसंख्या भारतात आहे. लोकसंख्यावाढीची अनेक कारणे असली तरी धर्मसत्ता आणि राजसत्ता ही त्यातील प्रमुख कारणे आहे . बालविवाह, वाढता जन्मदर, आधुनिक आरोग्य सेवा, साक्षरतेचा अभाव यासारखी इतरही कारणे आहेत. वाढत्या लोकसंखेमुळे अनेक युवक बेरोजगार आहेत किंवा त्यांना हवं तसं काम आणि नोकरी भेटतं नाही.ह्यामुळे शिक्षणसुविधा,आरोग्य सुविधा,स्वच्छता योग्य प्रमाणात मिळत नाही. लोकसंख्या वाढ ही भारतातील सर्व समस्यांचे माहेरघर आहे. भारताच्या बऱ्याचशा राज्यामध्ये शिक्षण दर खालावलेले आहे. खासकरून गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण मिळत नाही. सरकार यावर विविध उपाययोजना राबवत आहेत.नैसर्गिक साधनसंपत्तीवर ताण आलेला आहे. वाढत्या लोकसंखेमुळे निसर्गाचा ऱ्हास होतो. लोकसंख्यावाढ रोखणे ही भारतीय लोकशाहीपुढे कडवे आव्हान आहे. बेरोजगारी : बेकारी अथवा वाढती बेरोजगारी ही भारतामधील एक प्रमुख समस्या आहे. भारतामध्ये आज लाखो तरुण नोकरीच्या शोधात आहेत. विशेष: सुशिक्षित तरुणांची यामध्ये संख्या मोठी असल्याचे प्राप्त आकडेवारीवरून दिसून येते० डेटा सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमीने सादर केलेल्या आकडेवारीनुसार भारतामध्ये डिसेंबर 2021 पर्यंत बेरोजगारांची संख्या तब्बल 5.3 कोटी इतकी होती. बेरोजगारीचा दर एप्रिल महिन्यामध्ये ५.१ % इतका नोंदविला गेला. ग्रामीण भागात बेरोजगारीचे प्रमाण १२.३% असून शहरी भागात ते १७.२% आहे. १५ ते २९ वयोगटातील युवकाचे बेरोजगासरीचे प्रमाण १३.८ % आहे० शासन आपल्या स्तरावर बेरोजगारी कमी करण्यासाठी प्रयत्न शील असले तरी ही ती आटोक्यात येत नाही याचे कारण काय असेल लोकसंख्यावाढ आहे. कंपन्यामध्ये तात्पुरती कमी पगारावर नोकरी हे सुद्धा एक दुसरे महत्वाचे कारण आहे. भारतात भविष्यात बेरोजगारी आटोक्यात आली नाही तर नेपाळ मध्ये झालेला जेन झी (झेड जेनेरेशन) चा उद्रेक भारतात ही होऊ शकतो हे राज्यकर्त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. यावरून बेरोजगारीचे भीषण वास्तव समोर येते. भ्रष्टाचार : भ्रष्टाचार ही भारतातील सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रांमध्ये विविध प्रकारे पसरलेली एक गंभीर समस्या आहे. यात लाचखोरी, गैरव्यवहार, आणि सार्वजनिक संसाधनांचा गैरवापर यांचा समावेश होतो. भ्रष्टाचाराचा भारतीय अर्थव्यवस्थेवर आणि लोकशाहीवर नकारात्मक परिणाम होतो. सार्वजनिक पदाचा गैरवापर करून स्वतःसाठी किंवा इतरांसाठी फायदा मिळवणे, सार्वजनिक अधिकाऱ्यांना कामासाठी किंवा सेवा मिळवण्यासाठी लाच देणे किंवा घेणे, सार्वजनिक संसाधनांचा गैरवापर,योग्यतेऐवजी नातेवाईकांना किंवा मित्रांना प्राधान्य देणे ही काही भ्रष्टाचाराची वैशिष्ठ्ये आहे. भ्रष्टाचारामुळे सरकारी तिजोरीचे नुकसान होते आणि आर्थिक विकास मंदावतो, लोकशाही कमजोर होते, सामाजिक असमानता वाढते० भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी कायदे आणि नियमांची कठोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे० भ्रष्टाचार रोखणे हे सुद्धा मोठे आव्हान भारतीय राज्यघटणे समोर आहे०भारतीय संविधांनासमोर असंख्य आव्हाने असले तरीही आपले संविधान त्यासाठी खूप सक्षम आहे हे वेळोवेळी सिद्धं झालेले आहे त्यासाठी फक्त आपल्याला शहाणे नागरीक म्हणून दरवेळेस लोककल्याणकारी न्यायिक सरकार निवडणे अत्यंत आवश्यक आहे. या भारत देशाला एक अखंड देश म्हणून एकसंघ राहण्यासाठी आणि विकसित राष्ट्र म्हणून उदयास येण्यासाठी अशा परिपक्व भारतीय राज्यघटनेची अत्यंत गरज आहे.येथील बहुसंख्य नागरिकांना आपले स्वातंत्र्य, हक्क आणि अधिकार आबादीत राखण्यासाठी या संविधानाशिवाय पर्याय नाही. म्हणून राज्यघटनेचे संरक्षण करणे हे आपले सर्वांचेच कर्तव्ये आहे.



**प्रा. भूषणकुमार मगरे**
**शिवाजी महाविद्यालय, कन्नड**
**८४५९९७२८६३**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २६ नोव्हेंबर २०२५

# संविधान : भारतीय लोकशाहीचे आत्मभान आणि भविष्याचा मार्गदर्शक

भारताचा इतिहास हा केवळ साम्राज्यांच्या उदय-पतनाचा किंवा युद्धांच्या नोंदींचा इतिहास नाही, तर मानवी मूल्यांचा, स्वातंत्र्याचा, सामाजिक परिवर्तनाचा आणि न्याय्य समाजाच्या शोधाचा इतिहास आहे. या इतिहासात सर्वात मोठा आणि शाश्वत टप्पा म्हणजे भारतीय संविधानाची निर्मिती आणि त्यानिमित्त घडलेले बौद्धिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक परिवर्तन. म्हणूनच 26 नोव्हेंबर हा दिवस केवळ एक औपचारिक स्मरणदिन नाही, तर भारतीय प्रजासत्ताकाच्या अस्तित्वाचा आत्मा, तत्त्वज्ञान आणि लोकशाहीच्या भविष्याचा दीपस्तंभ आहे. संविधान म्हणजे फक्त कायद्यांचा संग्रह नाही, तर राष्ट्राच्या मूल्यांचे, संघर्षांचे आणि आकांक्षांचे प्रतिबिंब आहे. यामुळेच संविधान हा दस्तऐवज नसून तो विचारप्रवाह आहे. शासनव्यवस्थेला दिशा देणारा, समाजाला मूल्याधिष्ठित करणारा आणि व्यक्तीला अधिकार व जबाबदारी यांच्यातील संतुलन समजावून देणारा एक जिवंत करार आहे. म्हणूनच संविधान दिन हा स्मरणाचा दिवस नसून आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण नागरिक म्हणून संविधानाच्या आत्म्याशी किती प्रामाणिक आहोत? आपण त्या मूल्यांना जपतो आहोत की विसरतो आहोत? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, संविधानिक लोकशाही ही केवळ शासनप्रणाली आहे की ती आपल्या जीवनपद्धतीचा, संस्कृतीचा अविभाज्य भाग बनली आहे? हे बघणे आवश्यक आहे.भारतीय संविधानाची निर्मिती ही केवळ कायदेविषयक प्रक्रिया नव्हती, तर ती विवेक, अध्ययन, संशोधन, संवाद, मतभेद आणि सामूहिक संमती यांच्या अनोख्या प्रवासातून साकारली गेली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली 284 सदस्यीय घटनासभा जवळपास 2 वर्षे 11 महिने 18 दिवस या कार्यात संलग्न होती. परंतु केवळ कालावधी महत्त्वाचा नाही, तर त्या प्रक्रियेचा बौद्धिक दर्जा, तर्कसंगतता आणि भविष्यदर्शी दृष्टिकोन व्यक्तिला चकित करणारा आहे. जगभरातील 60 हून अधिक देशांचे संविधान, ब्रिटिश संसदीय परंपरा, अमेरिकेचे मूलभूत अधिकार, फ्रेंच क्रांतीची स्वातंत्र्य-समानता-बंधुता तत्त्वे आणि बौद्ध चिंतनातील समाजकल्याण हे सर्व भारतीय समाजशास्त्रीय संदर्भात नव्याने व्याख्यायित झाले. संविधान केवळ शासनाचा पाया नाही, तर भारतीय समाजरचनेतील ऐतिहासिक विषमता, जात, वर्ग, धर्म, लिंग विषमता आणि सामाजिक अन्याय यांना आव्हान देणारी परिवर्तनसूचक क्रांती आहे. म्हणूनच संविधान हा कायदा नसून समतावादी सामाजिक क्रांतीचा मार्गदर्शक आहे.संविधानाच्या प्रस्ताविकेत व्यक्त झालेली "स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय" ही मूल्ये ही केवळ शब्द नाहीत, तर नागरिकांनी जगावे असे जीवनसूत्र आहेत. प्रस्तावना म्हणजे संविधानाचे हृदय, ज्यातून राष्ट्राची आत्मा ओतप्रोत भरलेली आहे. सामाजिक न्याय म्हणजे केवळ कायद्याने समानता नव्हे, तर व्यक्तीला समान संधी मिळावी ही जबाबदारी आहे. आर्थिक न्याय म्हणजे विकासाची फळे सर्वांपर्यंत पोहोचविण्याची यंत्रणा, तर राजकीय न्याय म्हणजे प्रत्येक नागरिकाला शासन प्रक्रियेत सहभाग देणे. आपल्या संविधानाने याच दृष्टीने सार्वत्रिक प्रौढ मताधिकार दिला आहे. तोही जात, धर्म, लिंग किंवा संपत्ती यांवर आधारित भेदभाव न करता. ही भारताच्या प्रगल्भ सामाजिक मनोवृत्तीची आणि समावेशकतेची साक्ष देणारी घटना होती. भारतीय संविधानाची समाजशास्त्रीय ताकद म्हणजे त्याचे धर्मनिरपेक्ष तत्त्व होय. धर्मनिरपेक्षता याचा अर्थ धर्मविरोध नव्हे, तर सर्व धर्मांना समान सन्मान व स्वातंत्र्य देणे. आपल्या समाजात धर्माचा प्रभाव केवळ श्रद्धेपुरता मर्यादित नसून सामाजिक ओळख, वर्तन, नातेसंबंध आणि संस्कार यांवर तो खोलवर परिणाम करतो. अशा बहुविध धार्मिक संरचनेच्या राष्ट्रात संविधानाने धर्म आणि शासन यात योग्य अंतर ठेवले, राज्य नागरिकांशी धर्माधारित भेदभाव करणार नाही. म्हणूनच धर्मनिरपेक्षता ही संकल्पना ऐतिहासिक दृष्टीने लोकशाही टिकवण्यासाठी आवश्यक आहे. तिचा उपयोग फाटे पाडण्यासाठी नव्हे, तर एकत्र आणण्यासाठी होणे आवश्यक आहे.भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार हे नागरिकांच्या स्वातंत्र्याचे किल्ले आहेत. अभिव्यक्तिस्वातंत्र्य, समानतेचा अधिकार, जीवन व स्वातंत्र्याचा अधिकार, शैक्षणिक व सांस्कृतिक अधिकार, शोषणविरोधी अधिकार हे सर्व व्यक्तीच्या सन्मानाचे आधारस्तंभ आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून या अधिकारांनी समाजातील वंचित, दुर्बल, स्त्री, आदिवासी, दलित आणि अल्पसंख्याक समुदायांना सामर्थ्य दिले. हे अधिकार लोकशाहीचा पाया आहेत, परंतु त्याचवेळी संविधानाने मूलभूत कर्तव्यांची कल्पना मांडून संतुलन निर्माण केले. केवळ अधिकार मागणे नव्हे, तर समाज व राष्ट्राबद्दल कर्तव्य पार पाडणे हे नागरिकतेचे परिपक्व रूप आहे. परंतु संविधान ही स्थिर संकल्पना नाही. ती परिस्थितीनुसार विकसित होणारी, बदल स्वीकारणारी सजीव प्रक्रिया आहे. म्हणूनच दुरुस्त्या या संविधानाचे सामर्थ्य आहेत. न्यायालयीन व्याख्या, लोकसंख्येतील बदल, तंत्रज्ञानातील प्रगती, आर्थिक स्वरूपातील परिवर्तन या सर्व घटकांमुळे संविधानाने स्वतःला वेळोवेळी सुधारत ठेवले आहे. "बदलता समाज — जिवंत संविधान" ही संकल्पना भारताच्या भविष्याचे मार्गदर्शन करते.संविधान दिन हा इतिहासाचे उदात्तीकरण करण्याचा दिवस नाही, तर वर्तमानाला प्रश्न विचारण्याचा दिवस आहे. आपण संविधानातील मूल्यांना मान देतो आहोत की त्यांच्या विरोधी वागतो आहोत? समाज माध्यमे, राजकीय वाद, ध्रुवीकरण, अंधश्रद्धा, जातीय-धर्मीय दुभंग, स्त्रीविरोध, पर्यावरणीय संकट, डिजिटल असमानता, बेरोजगारी, गरीबी या सर्व प्रश्नांची उत्तरे संविधानाने दिली आहेत, परंतु आपण त्या उत्तरांना कृतीत अंमलात आणतो आहोत का? संविधानाने नागरिकांना मोकळे विचार करायला शिकवले, पण आज विचार व्यक्त करणे आणि असहमती नोंदविणे ही एक आव्हानात्मक प्रक्रिया ठरत आहे. अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा अर्थ आहे तर्कशुद्धतेने प्रश्न विचारणे, परंतु आज मतप्रदर्शन हे भावना, असहिष्णुता आणि ध्रुवीकरणाच्या भोवऱ्यात अडकलेले दिसते. अशा वेळी संविधान केवळ पानांवर नाही, तर विचारांमध्ये जिवंत राहिले पाहिजे. आजची युवा पिढी मोठ्या शक्यता, वेग, तंत्रज्ञान आणि जागतिक दृष्टिकोनासह वाढते आहे. परंतु त्याचवेळी माहितीचा प्रचंड मारा, मूल्यसंघर्ष, ओळखांचे राजकारण, रोजगाराची असुरक्षा आणि दिशाहीनता यामुळे तिच्यासाठी संविधानाचे मार्गदर्शन आणखी महत्त्वाचे ठरते. कारण संविधानानेच तिला समानता, संधी, सन्मान, अभिव्यक्ती आणि प्रगतीची हमी दिली आहे. त्यामुळे संविधान दिन हा केवळ अभ्यासक्रमातील घटक नसून पुढील पिढीच्या भविष्याचे अधिष्ठान ठरायला हवा.भारतीय संविधानाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक न्यायाची बांधिलकी. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या-विमुक्त जमाती, इतर मागासवर्ग, स्त्रिया, अपंग, धार्मिक-अल्पसंख्याक आणि वंचित घटकांसाठी दिलेल्या विशेष तरतुदी ही केवळ कलमे नाहीत तर त्या भारतातील ऐतिहासिक विषमता आणि सामाजिक जखमांचे उपचार आहेत. समता म्हणजे सर्वांना सारखे वागवणे नव्हे, तर मागे राहिलेल्यांना पुढे आणण्याची जबाबदारी स्वीकारणे. म्हणूनच सामाजिक न्याय हा संविधानाचा भावनिक केंद्रबिंदू आहे, जो एका समतामूलक समाजाच्या दिशेने वाटचाल करतो. संविधान दिनाचा खरा अर्थ समजून घेताना हे महत्त्वाचे ठरते की संविधान नागरिकांना फक्त हक्क देत नाही, तर जबाबदार नागरिकत्व शिकवते. संविधानाने विचारमुक्तता दिली आहे, परंतु त्याचवेळी संवाद, तर्क, वैज्ञानिक दृष्टिकोन, शांत सहअस्तित्व आणि सांस्कृतिक विविधतेचा सन्मान करण्याचा मार्ग दाखवला आहे. संविधान मूल्यांचे संरक्षण करते, पण एका मूल्याच्या नावाखाली दुसऱ्या मूल्याचे दमन करण्याचा अधिकार कोणालाही देत नाही. म्हणूनच संविधानाचा आत्मा जपणे ही प्रत्येक नागरिकाची आणि संस्थेची जबाबदारी आहे. आजच्या सामाजिक वास्तवात संविधानावरील विश्वास हे लोकशाहीचे ऑक्सिजन आहे. विश्वास नष्ट झाला तर लोकशाहीचे अस्तित्व धोक्यात येते. म्हणून संविधान दिन अनुभवताना हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की संविधान फक्त न्यायालयांचे पुस्तक नाही, तर आपल्या नागरिकतेचे तत्त्वज्ञान आहे. राष्ट्राच्या वाढीचा मार्ग संविधानाच्या चौकटीतून जातो, आणि टिकाऊ विकास, सामाजिक सलोखा, लोकशाही मूल्यांचा सन्मान आणि सहजीवन यांना संविधानाचे मार्गदर्शन अनिवार्य आहे.शेवटी, संविधानाने भारताला केवळ शासनव्यवस्था दिली नाही, तर स्वाभिमान, नागरिकत्व, अधिकार, समानता, न्याय आणि मानवी मूल्यांची दिशा दिली. त्यामुळे संविधान दिन हा साजरा करण्याचा दिवस आहे, पण तो साजरा करण्याची पद्धत केवळ कार्यक्रम, भाषणे किंवा औपचारिकता नसावी; तर आत्मपरीक्षण, अध्ययन, संवाद, तर्क, संवेदनशीलता आणि जबाबदार आचरणातून संविधान जिवंत ठेवण्याची प्रतिबद्धता असावी. कारण संविधान जिवंत आहे ते आपल्या विचारांमध्ये, वागणुकीत, संघर्षात, सामाजिक चळवळींमध्ये, न्यायालयात, संसदेत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे एका जागरूक, संवेदनशील नागरिकाच्या मनात. संविधान म्हणजे देशाचा आत्मा आणि तो आत्मा जिवंत राहिला पाहिजे, कारण संविधान वाचल्याने नाही, तर जगल्याने लोकशाही मजबूत होते.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. 9960103582
bagate.rajendra५@gmail.com